# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 20 June 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: २० जून २०२४ दुपारी १.०० वा.

****

दिल्लीतल्या सफदरजंग रुग्णालयात गेल्या चोवीस तासांत उष्माघातामुळं तेरा जणांचा मृत्यू झाला आहे. तर ३३ जणांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

देशाच्या आर्थिक क्षेत्राची सायबर अनुकुलन क्षमता वाढवसाठी भारतीय संगणक आपत्ती प्रतिसाद दल –सीईआरटी–आणि मास्टरकार्ड इंडिया यांनी सायबर सुरक्षा सहकार्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. आर्थिक क्षेत्राची सायबर सुरक्षितता मजबूत आणि सक्षम करण्यासाठी या दोन्ही संस्था आपापल्या विशेष तज्ज्ञांचं मार्गदर्शन घेणार असल्याचं इलेक्ट्रॉनिकी आणि सूचना प्रौद्योगिकी मंत्रालयानं म्हटलं आहे.

****

राज्यभरात पेरणीला सुरुवात झाली असून डिएपी खताची शेतकऱ्यांकडून जास्त मागणी होत आहे. मात्र चालू खरिप हंगामामध्ये शेतकऱ्यांनी केवळ डिएपी खतावरच अवलंबून न राहता बाजारामध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करावा, असं आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आलं आहे. एसएसपी खत देशांतर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद–१६ टक्के तर सल्फर आणि इतर घटक समाविष्ट आहेत. डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरियाची अर्धी गोणी आणि एसएसपीच्या तीन गोणी खतांचा वापर डिएपी खताला चांगला पर्याय आहे. त्यामुळं डिएपी खताची कमतरता भरुन काढता येईल, असं कृषी आयुक्तालयाचे उपसंचालक संदिप तांबे यांनी म्हटलं आहे.

****

केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं मंगळवारी १८ तारखेला झालेली युजीसी नेट परीक्षा पेपरफुटीच्या शक्यतेमुळं रद्द केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी यावरून केंद्रसरकारवर कडाडून टीका केली आहे.
नुकत्याच पार पडलेल्या नीट परीक्षेत झालेला गोंधळ ताजा असताना नेट परीक्षेसंदर्भातला प्रकार म्हणजे सरकारच्या अकार्यक्षमतेचं आणखी एक उदाहरण असल्याचं पाटील यांनी आपल्या सामाजिक प्रसार माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

****

पालघर जिल्ह्यात काल रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरुच आहे. सतत होणाऱ्या पावसामुळं जिल्ह्यातल्या सूर्या, वैतरणा, देहर्जा या नद्या ओसंडून वाहत आहेत. मनोर-वाडा भिवंडी रस्त्यावरील पर्यायी पूल पाण्याखाली गेल्यामुळं वाहतूक ठप्प झाली आहे. पालघर केळवे, परिसरातील अनेक छोटे रस्ते पाण्याखाली गेल्यानं गावांचा संपर्क तुटला आहे. बोईसर, धनानीनगरमधल्या अनेक सखल भागातही हीच स्थिती असून अनेक लोकांच्या घरात पाणी शिरलं आहे. उमरोळी रमानगर इथंही पाणी भरल्यानं गावाचा संपर्क तुटला आहे, रस्त्यावर झाड कोलमडून पडल्यानं वाहतूकही ठप्प झाली. डहाणू उपनगरीय लोकल सेवेवर परिणाम झाला असून गाड्या उशिरानं धावत आहेत.

****

उद्या २१ तारखेला साजऱ्या होणाऱ्या जागतिक योग दिनानिमित्त हिंगोली शहरात आज योग जागरूकता फेरी काढण्यात आली. हिंगोली जिल्हा प्रशासन, जिल्हा योग समिती, पतंजली योग समिती, माणिक स्मारक आर्य विद्यालयाचे विद्यार्थी तसंच योग जागृतीसाठी काम करणाऱ्या सर्व स्वयंसेवी संस्थांनी या फेरीत सहभाग नोंदवला. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी निरोगी आयुष्यासाठी योगाभ्यासाच्या उपयुक्ततेबाबत मार्गदर्शन केलं.

****

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र काही ठिकाणी, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी तर विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

****

तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या तिसऱ्या टप्प्यातल्या उपांत्य फेरीत काल भारताच्या ज्योती सुरेखा वेन्नम, परनीत कौर आणि अदिती गोपीचंद स्वामी यांच्या संयुक्त संघानं तुर्कीचा २३४-२२७ अशा गुणांनी पराभव केला. शनिवारी २२ तारखेला अंतिम सामन्यात सुवर्णपदकासाठी भारतीय संघ एस्टोनियाच्या संघाशी लढत देणार आहे.

दरम्यान, टेनिसमध्ये, भारताचा रोहन बोपन्ना आणि त्याचा ऑस्ट्रेलियन जोडीदार मैथ्यू एबडेन, क्वींस क्लब चँम्पियनशिप दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचले आहेत.

****

टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना अफगाणिस्तानसोबत होणार आहे. बार्बाडोस इथं होणारा हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरु होईल. दरम्यान, आज सकाळी झालेल्या सामन्यात इंग्लंडनं वेस्ट इंडिजचा आठ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करत वेस्ट इंडिजनं इंग्लंडसमोर १८१ धावांचं लक्ष्य ठेवलं, इंग्लंडनं हे लक्ष्य दोन गडी गमावत अठराव्या षटकात गाठलं.

******